Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# आधुनिक महाराष्ट्रातील बंडखोर समाज सुधारक पंडिता रमाबाई (इ.स. 1858–1922)

**प्रा. आर. बी. वाघ**
इतिहास विभागप्रमुख
श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय
अमरावती

**प्रस्तावना :**

महाराष्ट्रात प्रबोधनाच्या लाटेला सुरूवात झाल्यानंतर अनेक बंडखोर समाज सुधारकांचा उदय झाला होता. त्यांच्या मुलभूत कार्यामुळे तत्कालीन समाजात अनेक सुधारणा घडवून आल्या होत्या. त्यामध्ये महात्मा फुले, सवित्रीबाई फुले, शाहू महाराज, आगरकर, रानडे इत्यादी त्या कालखंडात महिलांना घराच्या बाहेर पडण्याचा अधिकार नव्हता परंतु काही मोजक्या महिलांनी समाजातील शोषीत, पीडत महिलांसाठी पुढाकार घेतला त्यामध्ये पंडिता रमाबाईचे नांव अग्रक्रमाने घ्यावे लागते. सावित्रीबाईंनी महात्मा फुले यांच्या मदतीने महिलांसाठी कार्य केले परंतु पंडिता रमाबाईला अशी साथ मिळाली नाही तरीही त्या घाबरल्या नाही. त्यांनी प्रस्थापित समाजाला झुगारून दिले. आपल्या बुद्धिचा आणि तर्काचा वापर करून बाल विधवांच्या समस्या सोडवण्यासाठी तर्कवादी दृष्टिकोणातून प्रहार केला होता. हे कार्य करण्यासाठी कोणाची पर्वा केली नाही. ते कार्य करण्यासाठी प्रस्थापिताचा मोठा विरोध आणि टिका टिप्पणी सहन करावी लागली. परंतु त्या तसूभरही मागे हटल्या नाही. त्यांना नेहमी असे वाटत असे की स्त्री ही समाजातील अविभाज्य घटक आहे परंतु तिच्यावर लहानपणीच बालविवाह घडवून आणले जातात आणि जर तिचा पती मृत्यु पावला तर त्या स्त्रीला संपूर्ण आयुष्य विधवा म्हणून जीवन जगावे लागत असे. हे बदलण्यासाठी पंडिता रमाबाईंनी कशाचीच पर्वा न करता त्यांना न्याय आणि सन्मान मिळवून देण्यासाठी कार्य केले होते. त्यांच्या कार्यामुळे आज समाजातील महिला वर्गांना सन्मान आणि पुरूषांचा पाहण्याचा दृष्टिकोन बदलला याचे संपूर्ण श्रेय पंडिता रमाबाई सारख्या महिलांना जाते.

**पूर्वचरित्र :**

पंडिता रमाबाईचा जन्म डोंगरे या ब्राम्हण कुटूंबात २३ एप्रिल १८५८ रोजी झाला होता. त्यांचे वडिल विद्वान पंडित आणि पुरोगामी सुधारक विचाराचे होते. त्यांनी त्या कालखंडात समाजाला न जुमानता आपली पत्नी लक्ष्मीबाईला वेदाचे व धर्मशास्त्राचे शिक्षण दिले होते. त्यांचा हा विचार क्रांतिकारक होता असे रमाबाईने म्हटले होते. या कारणामुळे समाजाने त्यांना बहिष्कृत केले होते. त्यांनी आपले गाव सोडून म्हैसूर संस्थानातील गंगामुळ या गावात आले. याच ठिकाणी

रमाबाईंचा जन्म झाला होता. रमाबाईंचे वय ९ वर्षाचे झाले परंतु लग्न नाही म्हणून समाजाने बहिष्कृत केले. त्यांच्या आई वडिलांनी तीर्थयात्रेला प्रारंभ केला. १८७७ च्या दुष्काळात आई वडिलांचे निधन झाले. १८७८ मध्ये मोठा भाऊ श्रीनिवासशास्त्री सोबत रमाबाई कलकत्त्याला आल्या तिथे त्यांच्याकडे असलेल्या संस्कृतच्या ज्ञानाची कदर झाली. त्यांच्या बुद्धिमत्तेचे कौतुक करण्यात आले. त्या वयात त्यांना पुराणातील १८ श्लोक पाठ होते. या विद्वत्तेमुळे कलकत्त्याच्या सिनेट हॉलमध्ये विद्ववत सभेत त्यांना पंडिता व सरस्वती पदव्या बहाल करण्यात आल्या. त्या ठिकाणी आनंद मोहन बोस यांनी बंगालमधील महिलांसाठी सभा बोलावली होती. ती पहिली सभा आणि रमाबाई पहिली वक्ता होती. या सभेतील महिलांनी त्यांना भारतवर्षीय स्त्रियांचे भूषण म्हणून मानपत्रही दिले होते. या सभेत ब्राम्हो समाजाचे केशवचंद्र सेन यांच्या सोबत संपर्क आला होता.

**आर्य महिला समाज :—**

ब्राम्हो समाजातील केशवचंद्रसेन सोबत कार्य करत असतांना या समाजातील तरूण कार्यकर्ते बिपिन बिहारीदास मेधावी या शुद्र जातीतील पुरोगामी विचारांच्या वकिला सोबत त्यांचा विवाह १३ ऑक्टोबर १८८० रोजी झाला. यामुळे परंपरावादी समाजातून त्यांना मोठा विरोध झाला होता. १८८२ साली त्यांना मनोरमा नावाची मुलगी झाली होती. पुण्यात आल्यावर यांनी आपल्या विद्वत्तेची छाप पुण्यातील विद्वानांवर पाडली होती. पुण्यातील न्यायमूर्ती रानडे, भांडारकर यांच्या सामाजिक कार्याची मदत त्यांना मिळाली होती. त्यामुळे रमाबाईंनी बालविवाह, पुर्नविवाह बंदी, केशवपन, विधवा पद्धती यासारख्या समाज विघातक प्रथांना चालीरितींना विरोध करून मोडण्यासाठी प्रत्यक्ष प्रयत्न सुरू केले होते. त्याच हेतूने पुणे या ठिकाणी १ मे रोजी १८८२ रोजी आर्य महिला समाज या सेवाभावी संस्थेची स्थापना करण्यात आली होती. लवकरच या संस्थच्या शाखा अहमदनगर, सोलापूर, ठाणे, मुंबई, पंढरपूर, बार्शी इत्यादी ठिकाणी सुरू करण्यात आल्या होत्या. १८८२ साली रमाबाईने 'स्त्री धर्म नीती' हे पुस्तक लिहून स्त्रिया व समाज सुधारणेवरील आपले विचार स्पष्ट केले होते.

**पंडिता रमाबाईंची हंटर कमिशनला साक्ष :—**

भारताचे उदारमतवादी व्हॉईसरॉय लॉर्ड रिपन यांनी भारतातील भविष्यकालीन शिक्षणाचा आढावा घेण्यासाठी १८८२ ला हंटर कमिशनची नेमणूक करण्यात आली होती. त्या कमिशनसमोर भारतीय शिक्षणावरील आपले विचार मांडतांना स्त्री शिक्षणाची भारतातील अवस्था व त्याविषयी नव्याने धोरण आखण्याची गरज प्रतिपादन केली. ५ सप्टेंबर १८८२ ला साक्ष्य देण्यात आली. त्यांचे इंग्रजीत भाषांतर करण्याचे कार्य सौ. मिचेल यांनी केले. त्या साक्ष्यमध्ये रमाबाईंनी काही सुचना केल्या होत्या.

(१) मुलीच्या शाळेत शिक्षिका म्हणून महिलाच असाव्यात

(२) त्या शिक्षिकेने मुलीच्या वर्तनावर नजर ठेवावी.

(३) स्त्रि समस्यांच्या दृष्टिकोणातून वैद्यकीय शिक्षणात महिलांना प्राधान्य देण्यात यावे. रमाबाईंचे हे विचार कमिशनला आवडले. इंग्लंडमध्ये त्याला प्रसिद्धी मिळाली. इंग्लंडमधून भारतात महिला डॉक्टर आणि परिचारिका पाठवण्यात आल्या होत्या. पंडिता रमाबाईंची ही साक्ष्य प्रसिद्ध करून मुंबई टाइम्सने त्यांचे कौतुक केले होते.

**परदेशी यात्रा व धर्मांतर :—**

रमाबाई सामाजिक आणि धार्मिक सुधारणेचे कार्य करत असतांना ख्रिश्चन मिशनरी लोकांच्या संपर्कात आल्या. १८८३ साली स्त्रियांच्या उदाराकरिता आणि मुलगी मनोरमा हिच्या वैद्यकीय शिक्षणाकरीता इंग्लंडला गेल्या. इंग्लंडला जाण्याचा आणि राहण्याचा सर्व खर्च आपल्या 'स्त्रि धर्म नीती' या पुस्तकांच्या विक्रीतून केला होता. इंग्लंडमधील वांटिज गावच्या सेंट मेरी या चर्चमध्ये राहत असे. येशुच्या स्त्रियांबाबतच्या दृष्टिकोणामुळे तसेच ख्रिस्ती धर्माच्या मानवतावादी आणि सेवाभावी वृत्तीकडे आकर्षित झाल्या त्यामुळे त्यांनी २९ सप्टेंबर १८८३ रोजी आपल्या मुलीसोबत ख्रिश्चन धर्माचा स्विकार केला होता. जरी रमा बाईंनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला तरीही हिंदू धर्म आणि भारतीय असल्याचा अभिमान कधीच सोडला नाही. त्यांनी आपली वेशभूषा, राहाणीमान आणि शाकाहारी जेवन यातून दाखवून दिले होते. त्यांच्या मतानुसार ''धर्मांतर म्हणजे वैचारिक बदल'' तो बदल भरतातील प्रस्थापित वर्ग स्वीकारण्यास मनाई करत असे. परंतु काळानुसार त्यात बदल होणे आवश्यक असते. त्यासाठी मानवाने बुद्धिचा आणि तर्काचा वापर केला पाहिजे.

**अमेरिकेतील रमाबाईचे कार्य :—**

भारतातील पहिल्या महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी यांच्या पदवीदान समारंभास रमाबाई उपस्थित होत्या. भारतातील बालविधवांना उपयुक्त होणारी बालोद्यान शिक्षण पद्धती त्यांनी शिकवून घेतली होती. त्याचबरोबर भारतातील बालविधवांच्या प्रश्नांवर उहापोहा करणारे हायकास्ट हिंदू वूमन हे इंग्रजी भाषेतील पुस्तक लिहिले होते. १८८९साली त्या भारतात वापस आल्या भारतात वापस आल्यानंतर त्यांनी अमेरिकेची लोकस्थित व प्रवासवृत्त हे प्रसिद्ध पुस्तक लिहिले होते.

**शारदा सदनची स्थापना (११ मार्च १८८९) :—**

रमाबाई भारतात आल्यानंतर त्यांनी मुंबई या ठिकाणी शारदा सदनची स्थापना करण्यात आली होती. सदन म्हणजे विधवा महिलांसाठी वसतिगृह व शाळा होती. या संस्थेत दाखल होणारी पहिली महिला विधवा 'शारदा' होती म्हणून शारदा सदन नाव ठेवण्यात आले होते. हे सदन रमाबाईंनी का सुरू केले याविषयी त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. ''त्या म्हणतात शारदा गद्रे बाल विधवाला पाहताच क्षणी माझ्या मनात कालवा—कालव सुरू झाली होती. ती वयाच्या पाचव्या वर्षी विधवा झाली होती. आजपर्यंत जे विचार मनात घोळत होते आज प्रत्यक्ष ते कार्य

करण्यास त्यांना भाग पडले. आपल्या भगिनी ज्या हाल अपेष्टा यातना भोगतात ते संपवण्यासाठी आणि बालविधवाच्या जीवनात परत नवचैतन्य आणण्यासाठी कार्य सुरू केले होते. या सदनच्या रूपाने कुटूंबात कधीच प्रेम आणि जिव्हाळा न मिळालेल्या बालविधवांना प्रेमाचा हात आणि आपुलकीने सात्वंन करणाऱ्या रमाबाई मिळाल्या होत्या. त्याबरोबर त्यांनी काही विधवांचा पुनर्विवाह घडवून आणला होता. धोंडो केशव कर्वे यांच्या पत्नी आनंदीबाई (गोदूबाई) शारदा सदनच्या बालविधवा होत्या.

१८९० मध्ये आर्थिक आणि वातावरणाचा विचार करून त्यांनी शारदा सदन मुंबईवरून पुणे या ठिकाणी हालवले होते. सदनला आर्थिक सहाय्य अमेरिकेतून मिळाले. शारदा सदनवर तत्कालीन समाजातील परंपराप्रिय नेत्यांनी हल्ले चढविले की रमाबाई हिंदू मुलींना बाटवतात. त्या हिंदू मुलीला ख्रिश्चन करण्याचा कट करत आहे. केसरीतून त्यांच्यावर टिका झाली परंतु गोपाळ गणेश आगरकरच्या सुधारकने त्यांची बाजू उचलून धरली. यावरून रमाबाईंनी तत्कालीन कालखंडात विधवा महिलांसाठी एक आसरा आणि हक्काचे घर निर्माण केले होते. संपूर्ण महाराष्ट्रात प्रस्थापित वर्गाचे वर्चस्व असतांना त्यांच्या विरोधात जाणून धर्मशास्त्रात ज्याला संमती नाही असे कार्य करून दाखविले. त्या कोणत्याही टीकेला आणि अडचणीला घाबरल्या नाही म्हणून त्यांना महिलांच्या उदारकर्ते समाज सुधारक म्हणतात.

**इतर सामाजिक सुधारणा :—**

१८९१ मध्ये सरकारने संमती वयाचे विधेयक पास केले होते. त्या विधेयकात विवाहाचे मुला—मुलीचे वय वाढवणार होते. त्या विधेयकाला रमाबाई, काशीबाई कानिटकर इत्यादी महिलांनी पाठिंबा दर्शवला होता. १८९८ मध्ये रमाबाईंनी पुणे दौंड महामार्गावर मुक्ति सदन कडेगाव या ठिकाणी स्थापन केले होते. या मुक्ति सदनमध्ये निराश्रीत मुलींच्या शिक्षणाची आणि राहणे व जेवणाची व्यवस्था केली जात असे. मुक्तिसदन मध्ये प्रिती सदन, शारदा सदन व शांती सदन या इमारती होत्या. त्यामध्ये वेगवेगळया गटातील महिला राहत असे. महिलांना आर्थिक दृष्टीने परिपूर्ण करण्यासाठी आणि श्रमाचे महत्व वाटावे म्हणून शेती, विणकाम, मुद्रणकाम इत्यादींचे शिक्षण दिले जात असे. या सदनाला लागणाऱ्या दैनंदिन वस्तु याच महिला तयार करत असे यामुळे त्या महिला आपल्या आयुष्यातील दु:ख विसरून जात आणि आरोग्यमय जीवन जगत असे. १८९७ मध्ये मध्यप्रदेशातील दुष्काळी लोकांसाठी (Poor House) ६०० महिलांना गावगुंडांच्या शोषणातून सोडवले होते. १८९७ मध्ये महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीला १९०० गुजरात मध्ये भयंकर दुष्काळ पडला तेव्हा १०० महिलांना सदनात आणून त्यांचा सांभाळ केला होता.

**निष्कर्ष :—**

- रमाबाईंनी प्रत्यक्ष अनुभव घेतला होता.
- बालविधवाच्या वेदनामुळे त्या दु:खी होत असतांना त्यांना त्यातून प्रेरणा मिळाली होती.

- सनातन्याच्या कोणत्याच टिकेला न घाबरता आपले कार्य सुरू ठेवले होते.
- केवळ बालविधवासाठीच कार्य केले नाही तर दुष्काळी, अपंग, महारोगी लोकांच्या सेवेकडे लक्ष दिले.
- बाल विधवानां कुटुंबातील आणि बाहेरील लोकांच्या मानसिक व शारीरिक छळापासून सोडवले.
- बालविधवाच्या शिक्षणासाठी हंटर कमिशनला साक्ष्य दिली आणि महिलांना शिकवण्यासाठी महिला शिक्षिकेची शिफारस केली होती.
- महिलांना वैद्यकीय शिक्षणाला सुरूवात करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन दिले.

**संदर्भ ग्रंथ सूची :—**

➢ घोडके ह.म. — महाराष्ट्र गाथा भाग २, राजहंस प्रकाशन, पुणे २००५.
➢ लांजेवार ज्योती — भारतीय समाज आणि स्त्री, युगावा प्रकाशन, पुणे.
➢ भिडे जी.एल. पाटील एन.व्ही. — महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, जून २००९.
➢ रानडे प्रतिभा — स्त्री प्रश्नाची चर्चा, एकोणविसावे शतक, पद्मगंधा प्रकाशन, पुणे २००५.
➢ सावळे / मोरे दिपा — आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (इ.स. १८१८—१९०५) एज्युकेशन प्रकाशन, औरंगाबाद, जून २०१३.
➢ किर, धनंजय, मालशे स.ग. आणि फडके य.दि. — महात्मा फुले समग्र वाङमय, प्रकाशक,सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, सहावी आवृत्ती, नोव्हेंबर २००६.
➢ कठारे, अनिल — महाराष्ट्रातील समाजसुधारक, विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद, जानेवारी २०१४.
➢ टाले पी.ए. — महाराष्ट्रातील समाजसुधारक, साई ज्योती पब्लिकेशन, तीननल चौक, नागपूर २००८.
➢ टाले पी.ए. — आधुनिक महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणा चळवळीचा इतिहास, साई ज्योती प्रकाशन, नागपूर, सप्टेंबर २०१८.
➢ पाटील व्ही.बी. — एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रामधील समाजसुधारणे चा इतिहास, के सागर पब्लिकेशन, पुणे २००८.